जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दि. 15-1-2020
तरुण भारत

# जलयुक्त विद्यापीठ संकल्पनेवर विद्यापीठाची दिनदर्शिका

## प्रकाशन सोहळ्यात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून कौतुक

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने यंदा 'जलयुक्त विद्यापीठ' या संकल्पनेवर आधारित दिनदर्शिका प्रकाशित केली आहे. त्याचे सर्वच स्तरातून स्वागत होईल, असा विश्वास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या दिनदर्शिका व दैनंदिनीचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठ गेल्या चार वर्षांपासून विविध विषयांवर आधारित दिनदर्शिका प्रकाशित करीत आहे. त्याचप्रमाणे दैनंदिनीही पाच वर्षांपासून प्रकाशित होत आहे. 'जलयुक्त शिवाजी विद्यापीठ' विषयावर आधारित २०२० ची दिनदर्शिका प्रकाशित केली आहे. त्याचे स्वरुपही आकर्षक आहे. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता तथा दैनंदिनी समितीच्या अध्यक्षा डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. आर. के. कामत, डॉ. विजय ककडे, डॉ. अक्षय सरवदे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विभा अंत्रेडी, माणिक कदम, डॉ. पी. एस. पांडव, डॉ. वैभव ढेरे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : सन २०२० च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी परीक्षा संचालक गजानन पळसे, व्ही. टी. पाटील आदी.

# शिवाजी विद्यापीठाचा इतिहास आता पुस्तक स्वरुपात

## कुलगुरु शिंदे यांची माहिती : 'लोकमत' कोल्हापूर शहर कार्यालयास सदिच्छा भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाला स्थापनेपासून खूप मोठा इतिहास आहे. तो नव्या पिढीसमोर यावा यासाठी हा इतिहास लवकरच पुस्तक स्वरुपात येणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.



'लोकमत' कार्यालयास कुलगुरु डॉ. शिंदे यांनी मंगळवारी नववर्षाच्या शुभेच्छा देण्यासाठी भेट दिली. याप्रसंगी 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले उपस्थित होते.

डॉ. शिंदे म्हणाले, 'मुंबई विद्यापीठाचा दीडशे वर्षांचा इतिहास साक्षेपी संपादक अरुण टिकेकर यांनी लिहिला आहे. शिवाजी विद्यापीठाची उभारणी झाली तो स्वातंत्र्यानंतरचा काळ आहे. विद्यापीठ स्थापन होताना जी विधीमंडळात चर्चा झाली ती देखील फार मोलाची आहे. या इतिहास लेखनाची जबाबदारी डॉ. भालबा विभुते यांच्या अध्यक्षतेखालील संपादक मंडळाकडे आहे. त्यांच्याकडून लेखनाचे बरेचसे काम होत आले आहे. त्यामध्ये विद्यापीठाच्या जडणघडणीचा आलेख मांडला जावा असा प्रयत्न आहे.'

'शिवाजी विद्यापीठामध्ये शहर आणि ग्रामीण भागांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने शिकत आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्यापीठाचा नावलौकिक होत आहे. विद्यापीठात सध्या आंतरराष्ट्रीय दर्जाचे विविध प्रकल्प सुरु आहेत. अमेरिकी कंपनीची जीपीएस प्रणाली वापरली जात होती. तथापि भारताने स्वत: विकसित केलेली आयआरएनएसएस ही उपग्रह मालिका अवकाशात यशस्वीरीत्या प्रक्षेपित केली आहे. तिच्या साहाय्याने भारत स्वत:ची अत्याधुनिक जीपीएस प्रणाली विकसित करतो आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश केंद्रामध्ये या उपग्रह मालिकेचा एक रिसीव्हर बसविण्यात आला आहे. तो अत्यंत प्रभावीपणे कार्यरत आहे. असा रिसीव्हर बसविण्यात आलेले शिवाजी विद्यापीठ हे देशातील एकमेव विद्यापीठ आहे असे डॉ. शिंदे यांनी सांगितले. विद्यापीठाने शंभराहून अधिक सामंजस्य करार केले आहेत. यामध्ये जर्मनीतील हॉनोव्हर विद्यापीठाचा समावेश आहे. त्याअंतर्गत येथील विद्यार्थी सहा महिन्यांसाठी जर्मनीत शिक्षण घेतील; तर तेथील विद्यार्थी सहा महिन्यांसाठी शिवाजी विद्यापीठात शिक्षण घेतील. शिवाय दोन परदेशी प्राध्यापकही येथील विद्यार्थ्यांना शिकवत आहेत असे डॉ. शिंदे यांनी सांगितले. यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर उपस्थित होते.

### सायबर सिक्युरिटी अँड डाटा सायन्सेस

फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर इन सायबर सिक्युरिटी अँड डाटा सायन्सेस मंजूर झाले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत ३५० हून अधिक शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात आले आहे. या केंद्रामार्फत सेफ्टी ऑडिट सेवा, शिक्षक व शासकीय अधिकारी प्रशिक्षण तसेच जागृती कार्यशाळाही घेण्यात येणार आहे.

### लवकरच कलासंग्रहालय

विद्यापीठातील युको बँकेशेजारील जागेमध्ये लवकरच कोल्हापूरचा सांस्कृतिक कलाइतिहास सांगणारे भव्य असे कलासंग्रहालय सर्वांसाठी खुले होत आहे. इमारत बांधून पूर्ण झाली आहे, असे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दि. 15-1-2020

तरुण भारत

# 'पावनखिंड रणसंग्रमातून शौर्यगाथेची शिकवण'




**शाहूवाडी: पावन प्रेरणा मोहिमेतर्गंत पालखी सोहळ्याप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, चिखली कॉलेजचे प्राचार्य डी. आर. पाटील आदी.**

शाहूवाडी
प्रतिनिधी

इतिहासाचा साक्षीदार असलेला हा परिसर आणि पावनखिंड रणसंग्राम आपणाला इतिहास आणि शौर्यगाथेची शिकवण देत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व देशभक्त नाईक कॉलेज चिखली (ता. शिराळा) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पन्हाळा पावनखिंड शिव पावन प्रेरणा मोहिमेच्या प्रसंगी ते बोलत होते. स्वागत प्रा. डी. आर. पाटील यांनी केले. कुलगुरू डॉ. शिंदे पुढे म्हणाले, इतिहास केवळ पुस्तकातून शिकण्यापेक्षा प्रत्यक्ष त्या ठिकाणावर जाऊन अनुभवल्यास अधिक रोमांचक आणि अद्भूत वाटतो. प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील म्हणाले, इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी या मोहिमेमध्ये सहभागी होऊन प्रत्यक्ष पन्हाळगड–पावनखिंड मोहिमेचा पायी चालून अनुभव घेतला ही गौरवाची बाब आहे.

पावन प्रेरणा मोहिमेचे नियोजन प्रा. डी. आर. पाटील यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. डॉ. मांतेश हिरेमठ यांनी केले. यावेळी प्रा. आर. आर. पाटील, प्रा. डॉ. संजय चिंदगे, प्रा. युवराज पाटील, प्रा. डॉ. प्रकाश दुकळे, प्रा. एस. आर. माने, प्रा. स्नेहा पाटील आदी सहभागी झाले होते.

# विद्यापीठाच्या वाणिज्य, व्यवस्थापन विभागप्रमुखपदी डॉ. श्रीकृष्ण महाजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या विभाग प्रमुखपदी प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नुकताच त्यांनी कार्यभार स्वीकारला आहे. यापूर्वी २००९ ते २०१७ या कालावधीत डॉ. महाजन यांनी हे पद सांभाळले आहे. सध्या ते भारत सरकारच्या इम्प्रेस स्कीम खाली प्रधानमंत्री जनधन योजनेचे मूल्यमापन या विषयावर संशोधन करीत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १३ विद्यार्थ्यांनी पीएच.डी.चे व १२ विद्यार्थ्यांनी एम.फील.चे संशोधन पूर्ण केले आहे. नॅक बेंगलोरचे मूल्यांकन तज्ज्ञ म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

सध्या ते शिवाजी विद्यापीठाच्या अकौंटन्सी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष आहेत. मुंबई विद्यापीठ, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठांच्या संशोधन समितीवर तज्ज्ञ म्हणून ते कार्यरत आहेत.